SANSKRUTI INTERNATIONAL
MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL
Journal homepage: http://www.simrj.org.in Journal UOI: 1.01/simrj

आदिवासी कवी वामन शेळमाके यांची कविता

प्रा. डॉ. ज्ञानेश्वर अंबादास वाल्हेकर

सहयोगी प्राध्यापक व मराठी विभागप्रमुख, बी. डी. काळे महाविद्यालय, घोडेगाव
ता. आंबेगाव जि. पुणे. ४१२४०८
इमेल आय. डी. dr.dawalhekar@rediffmail.com
मोबाईल नंबर ९४२१००११७४, ७७७५८६३८८६

प्रास्ताविक :

प्रा. वामन शेळमाके हे आदिवासी साहित्य चळवळीतील एक व्यापक दृष्टी असलेले सृजनशील प्रतिभावंत कवी आहेत. त्यांचा पहिलाच काव्यसंग्रह **'जागवा मने पेटवा मशाली'(१९९१)** प्रसिद्ध झाला आहे. प्रा. वामन शेळमाके आपल्या काव्यसंग्रहातून आदिवासींच्या वनवासमुक्तीचा नारा अधिक बुंलद करतात. त्यासाठी आवश्यक असलेली लेखणीची आवाहक क्षमता त्यांना स्व–अनुभवातूनच प्राप्त झाली आहे. आदिवासींच्या व्यथा, वेदना, दु:खाची, वनवासीपणाच्या यातनेची जातकुळीच निराळी आहे. या जातकुळीशी कवी सहृदयतेच्या नात्याने जोडले गेलेले आहेत. डॉ. सुभाष सावरकर त्यांच्या कवितेबद्दल म्हणतात की, ''या संग्रहातील कविता ही आर्ष पण सच्च्या भावनेची वाहक आहे. ती ज्या परिसरातून, ज्या पर्यावरणातून उसळून बाहेर आली त्या परिसर पर्यावरणातील भल्या बुऱ्याचा संपूर्ण गंध तिला लाभला असल्याचे पदोपदी जाणवते.'' या संग्रहातील कविता आदिवासींचं सामाजिक पर्यावरण आपल्या नजरेसमोर उभे करते. वर्णव्यवस्था, सरंजामशाही या प्रवृत्तीने हे पर्यावरण गढूळ करून टाकल्याचे या संग्रहातून जाणवते. आदिम जीवन संस्कृतीचा आशय प्रकट करताना रुढ अभिव्यक्ती नाकारून नव्या शब्द, प्रतिमांचा कवीने वापर केला आहे.

या संग्रहातील पहिलीच कविता 'मुक्तीचा संदर्भ' होय. आदिवासींच्या जीवनातील वनवासीपणाचं दु:ख संपविण्यासाठी कवी मुक्तीचा संदर्भ घेऊन येतात. आदिवासी हा वन व

काटेरी पिंजऱ्यात, व्यथा, वेदनांमध्ये जीवन कंठतो आहे. अशा हलाखीच्या परिस्थितीतून आदिवासींना बाहेर काढण्याचा कविमनाचा निर्धार आहे, तो व्यक्त होतो आहे.

''पण तुला शपथ घेऊन सांगतो
मरू देणार नाही तुला मी
या वणव्याच्या पसाऱ्यात.

आदिवासीं वनवासमुक्तीसाठी मरणाचा सखा–सोबती होण्याचं धाडस कवी दाखवत आहे.

'जंगलचा राजा' या कवितेतून प्राचीन काळात जंगलचा राजा असणारा आदिवासी आजच्या वर्तमानात मात्र उपाशी, कष्टकरी, भटका, भिकारी, पूर्वीचं राजवैभव गमावलेला, बेकारीत जीवन जगणारा, बेघर असा असून सुद्धा तो इमानाशी मात्र प्रामाणिक आहे. कारण,

''जंगलचा राजा आहे स्वाभिमानी
विकली नाही संस्कृती प्रस्थापितांच्या बाजारी''

प्रस्थापितांच्या शोषक बाजारामध्ये आदिवासींनी आपला स्वाभिमान गहाण ठेवलेला नाही.

'पेटले चित्त माझे' या कवितेत वनराईच्या मुक्तीचे स्वप्नदिवे आपण अनुभवतो आहे. यासाठीच क्रांतीच्या ज्योती मनामनात निर्माण होण्याचे कवी शपथपूर्वक सांगतात

''शपथ, तुझ्या रक्ताने माखलेल्या भूमीची
करेन तुझ्या पुत्रांना मुक्त सूर्य तेज बाणांनी''

आदिपुत्र सूर्याच्या तेजस्वी बाणांनी वनराईला मुक्त करण्याचे ध्येय कवी उराशी बाळगून आहे. त्यासाठीच कवीचे मन क्रांतिप्रवण झाले आहे. आदिवासींबाबत वर्णव्यवस्थेची भूमिका टाकाऊ, अमानुष अशा प्रकारची आहे. यातून आदिवासींच्या उत्थानाचा मार्ग सुलभ होणार नाही. संघर्षशीलतेची भूमिका घेऊनच हक्क,अधिकार मिळवावे लागतात. अन्यथा काळोखातच चाचपडावे लागते.

'अंधारी रात्र' या कवितेतही विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आदिवासींच्या जीवनातील अंधारी काळरात्र संपलेली नाही. म्हणून अज्ञान, दारिद्रय, अवहेलना यांच्याशी ज्वलंतपणे सामना करताना जिंदगीच्या प्रवासात अनेक काटे, दगड, पर्वत, वळणदार रस्ते या सर्वांचा अडथळा निर्माण केला आहे.

'जालीम हात' या कवितेतून आदिवासींच्या जीवनात जन्मत:च दारिद्रय, दु:ख, मृत्यूगत जिणे प्राप्त होते. अशा दु:खाशी कवीची नाळ जोडली जाते. युगानुयुगे आदिवासींचे हात जालीम केल्यामुळे अग्नीच्या ज्वाला आज सर्वत्र विखुरलेल्या दिसत आहे. पांढरपेशा–मध्यमवर्गीयांनी आदिवासी संस्कृतीची नकल करून हीन लेखले आहे. आदिम कलेची नक्कल हेच कटू सत्य कवीला स्वीकारावे लागते आहे.

'कोरकू' या कवितेतून आदिवासींचं प्रादेशिक सत्त्व ध्वनित होते. सातपुडा, मेळघाट, महादेव डोंगर सान्निध्यात राहणारे 'कोरकू' हे भोळे–भाबडे आहेत. परंतु लाचार नाही. या प्रदेशात त्यांचे मूळ निवासीपण आहे. असे हे मूळ निवासी कोरकू नीतिमान, प्रामाणिक आहे. चोरी, हेवा, कोर्टकचेरी यापासून अलिप्त असून परिसरातील संधीसाधू सावकारांनी आदिवासींचे जगणे हैराण करून टाकले आहे. अशा शोषित जीवनाला कवी नाकारतात.

'आदिमा!' या कवितेत कवीने आदिमालाच प्रश्नचिन्हांकित केले आहे. आदिम जीवनातील अंधाराला ओलांडून प्रकाशाचा शोध घेण्याचा प्रयत्न कवीने अनेक दिवसांपासून केला आहे. परंतु विषमतेच्या जहराने आणि वर्णभेदाच्या रक्ताने कवीचे मन फोफावत आहे. कवीने तर माणुसकीची, मानवतेची, आदिम मुक्तीची हाक दिली आहे. वर्णव्यवस्थेच्या जहरी वातावरणातून कवीला कोण मुक्त करेल असा अगतिक व आशावादी सूर प्रकट होतो आहे.

'उठा पेटवा' या कवितेत मृत्युंजयी सामर्थ्य असलेला कवी जाणवतो. यासाठीच पुराणातील सत्यवान आणि सावित्रीची पारंपरिक मिथ्स ते नाकारतात. आजच्या वर्तमान वास्तवात मात्र या मिथ्सला स्त्रीमुक्ती चळवळीमुळे पृथक परिमाण लाभले आहे. स्त्रीमुक्ती चळवळीला मुक्तीचे सूत्र गवसले नसताना आदिम स्त्री मुळातच मुक्त आहे. परंतु दारू व इतर व्यसनापासून तिचे दास्यत्व

'अंधारी रात्र' या कवितेतही विसाव्या शतकाच्या शेवटच्या दशकात आदिवासींच्या जीवनातील अंधारी काळरात्र संपलेली नाही. म्हणून अज्ञान, दारिद्रय, अवहेलना यांच्याशी ज्वलंतपणे सामना करताना जिंदगीच्या प्रवासात अनेक काटे, दगड, पर्वत, वळणदार रस्ते या सर्वांचा अडथळा निर्माण केला आहे.

'जालीम हात' या कवितेतून आदिवासींच्या जीवनात जन्मत:च दारिद्रय, दु:ख, मृत्यूगत जिणे प्राप्त होते. अशा दु:खाशी कवीची नाळ जोडली जाते. युगानुयुगे आदिवासींचे हात जालीम केल्यामुळे अग्नीच्या ज्वाला आज सर्वत्र विखुरलेल्या दिसत आहे. पांढरपेशा–मध्यमवर्गीयांनी आदिवासी संस्कृतीची नकल करून हीन लेखले आहे. आदिम कलेची नक्कल हेच कटू सत्य कवीला स्वीकारावे लागते आहे.

'कोरकू' या कवितेतून आदिवासींचं प्रादेशिक सत्त्व ध्वनित होते. सातपुडा, मेळघाट, महादेव डोंगर सान्निध्यात राहणारे 'कोरकू' हे भोळे–भाबडे आहेत. परंतु लाचार नाही. या प्रदेशात त्यांचे मूळ निवासीपण आहे. असे हे मूळ निवासी कोरकू नीतिमान, प्रामाणिक आहे. चोरी, हेवा, कोर्टकचेरी यापासून अलिप्त असून परिसरातील संधीसाधू सावकारांनी आदिवासींचे जगणे हैराण करून टाकले आहे. अशा शोषित जीवनाला कवी नाकारतात.

'आदिमा!' या कवितेत कवीने आदिमालाच प्रश्नचिन्हांकित केले आहे. आदिम जीवनातील अंधाराला ओलांडून प्रकाशाचा शोध घेण्याचा .प्रयत्न कवीने अनेक दिवसांपासून केला आहे. परंतु विषमतेच्या जहराने आणि वर्णभेदाच्या रक्ताने कवीचे मन फोफावत आहे. कवीने तर माणुसकीची, मानवतेची, आदिम मुक्तीची हाक दिली आहे. वर्णव्यवस्थेच्या जहरी वातावरणातून कवीला कोण मुक्त करेल असा अगतिक व आशावादी सूर प्रकट होतो आहे.

'उठा पेटवा' या कवितेत मृत्युंजयी सामर्थ्य असलेला कवी जाणवतो. यासाठीच पुराणातील सत्यवान आणि सावित्रीची पारंपरिक मिथ्स ते नाकारतात. आजच्या वर्तमान वास्तवात मात्र या मिथ्सला स्त्रीमुक्ती चळवळीमुळे पृथक परिमाण लाभले आहे. स्त्रीमुक्ती चळवळीला मुक्तीचे सूत्र गवसले नसताना आदिम स्त्री मुळातच मुक्त आहे. परंतु दारू व इतर व्यसनापासून तिचे दास्यत्व

दूर होण्याचे लढे उभारले पाहिजे. त्यासाठीच 'वनवासी' ही कविता क्रांतीचा सूर्य असणाऱ्या आदिमानवाला उद्देशून लिहिली आहे. कारण मतलबी वर्णव्यवस्थेचं उच्चाटन करण्यासाठी कवीने मृत्यूशी सामना करण्याचे ठरविले आहे. वर्णपाती व्यवस्थेने भिनवलेलं विष कवीनेही प्राशन केले आहे. म्हणून भूतकाळातील जिणे भविष्यात जगायला मिळणार नाही, यासाठी कवी अधिक दक्ष आहेत.

'विस्थापित आदिवासी आणि प्रस्थापित अशी सामाजिक विषमतेची दरी या देशात आहे. एकाला भीषण दुःख तर दुसऱ्याला भरपूर सुख अशा विषम वर्णपाती प्रस्थापित व्यवस्थेला मसणात गाडण्याची विद्रोही भाषा कवी करतात. आदिवासींनी दया, याचना, भीक मागण्यापेक्षा दुःख देणाऱ्या व्यवस्थेला संपविले पाहिजे. त्यासाठी आदिवासींची मने जागृत झाली पाहिजेत. आदिवासींना लुटणाऱ्या लुटारूंकडून दया, सहानुभूती नको आहे. कारण 'पुकारूनी आव्हान' या कवितेत वनमातेनेच समतेचा, अन्याय विरोधाचा, प्रेमाचा, बंधुत्वाचा जयघोष करून स्वतःचे रक्षण करण्याचे ठरविले आहे. अशाच वनमातेचे गुणगान करण्यास वनवीर कवी उत्सुक आहे. अरण्याचा मेवा खाऊन एकत्र होऊन आपणच आपल्या विरुद्ध न लढता अन्यायाविरुद्ध लढा देणे, हे आव्हान कवीने केले आहे. कविमनाचं आत्मपरीक्षण करणारी ही कविता ठरते.

'बुलंद आवाज' या कवितेत गावकुसाबाहेरील दुर्गम भागात राहणाऱ्या आदिवासींचे गडद अंधारातील दुःखाचे चित्रण केले आहे. हे दुःख नाहीसे करण्याचा कवीचा प्रयत्न ''लागलो तयारीस मी जीवंतपणी मरणाच्या'' (पृ. २६) अशा मरण्याच्या सिद्धीतून प्रकट होतो. 'लक्षवेध' या कवितेतही मृत्यू हाच कवीचा मित्र आहे, सखा–सोबती आहे. परंतु हा मित्रही पक्षपाती कारवायात सामील असतो. वर्णवाद्यांचा साथीदार असतो, म्हणूनच कवीने वनवीराच्या मुक्तीचे लक्षवेध भेदले आहे.

एकविसाव्या शतकाकडे वाटचाल करणाऱ्या देशात रानोमाळ भटकणाऱ्या आदिवासींच्या व्यथा, वेदना संपलेल्या नाहीत. सवर्णशाही व भांडवलशाही हे मोठं आव्हान आहे. आदिवासींच्या वन, जंगल, जमिनीवर अतिक्रमण झाल्यामुळे त्यांची जीवनसंस्कृती उद्ध्वस्त झाली आहे.

आदिवासींना सर्वच पातळीवर नागविले जात आहे. सवलत, कला, कौशल्य, संस्कृती, धर्म इ.च्या नावाखाली बिगर आदिवासींकडून लुटलं जात आहे.

'माझी साक्ष' या कवितेत आदिवासींच्या एकात्म समाजरचनेसाठी कवीची साक्ष असल्याची जाणीव चित्रित केली आहे. अन्याय, अत्याचार उराशी बाळगणाऱ्यांना कवी जागृत करण्याचे आवाहन करीत आहे. कारण समाजऋणातून मुक्त होण्यासाठी कवी संघटित होण्याची, जातविरहित भूमिका घेण्याचे सांगतात. अत्यंत व्यापकपणे लढा देण्याचा निर्देश ही कविता करते. यासाठीच कवीने 'क्रांतीची मशाल' या कवितेत मशाल हाती घेतली आहे. आदिवासींच्या जीवनात अनंत वेदना, दगडाझुडपांचा निवास, कंदमुळे, श्वापदाशी मैत्री, दारिद्र्याचे परचक्र, आपमतलबी वर्णव्यवस्थेची गोड भाषा अशा अवस्थेत जीवन जगणाऱ्या आदिमांना कवी समजावतो आहे. अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत समस्या भीषण आहे. दु:ख सोडून जाण्यापेक्षा विद्रोहाचं प्रतीक असलेली क्रांतीची मशाल पेटवून जाण्याचा उपदेश कवीने केला आहे. कारण क्रांतीचा वाहक असलेला कवी 'नव्या युगाच्या प्रतीक्षेत' आहे. यामुळेच प्रस्थापितांची सर्वच आमंत्रणे–निमंत्रणे नाकारली आहेत. आदिपुत्र एकलव्याच्या विचाराची धार कवीच्या लेखनाला प्राप्त झाली आहे. 'असा सूर निघत आहे' ही उपरोधात्मक कविता आहे. जातिव्यवस्थेच्या देशात जाती–जातींच्या अहंकारामुळे मानवतेची सर्वच मूल्ये गहाण ठेवलेली आहेत. 'मिले सूर हमारा तुम्हारा'' याचा प्रत्यय येण्यापेक्षा 'निघे धूर हमारा तुम्हारा'' असा विषम धूर जाणवतो आहे.

'अरण्यातील निखारे' ही या संग्रहातील लक्षणीय कविता आहे. आदिवासी भारत, अरण्यवासी भारताच्या संवेदना जागृत करणारा, त्यांच्या जाणिवेला चेतना देणारा आदिवासींचा इतिहास सत्य आहे. तो कपोलकल्पित नाही. गोंडवनातील आदिवासींची अस्मिता, त्यांचे हक्क व अधिकार, स्वातंत्र्य हे सर्व सरंजामी सावकारशाही व परकीय इंग्रजी सत्तेकडून हिसकावण्याचा यशस्वी प्रयत्न झाला. यात क्रांतिवीर नारायणसिंह उईके, गढामंडाल्याची राणी दुर्गावती व इतर शूरवीरांनी आदिसंतानामध्ये अंत:प्रेरणा, ऊर्मी, जिज्ञासा निर्माण केलेली आहेत. कवीने यातून

आदिवासींच्या श्रद्धास्थानांचा, प्रेरणा स्रोताचा, प्रेरक तत्त्वाचा शोध घेतला आहे. ही श्रद्धास्थानेच आदिवासींच्या मुक्तीचे दाते आहेत.

'धजलो रक्षणार्थ' या कवितेत वनप्रदेशात अन्यायी प्रस्थापित एकाधिकारशाही, नागरीकरण या सर्व वर्तमान वास्तवात आदिवासींच्या रक्षणासाठी धावून जाणारे बिगर आदिवासी आहे. परंतु खऱ्या आदिम जाणिवेने आदिवासींचा न्याय लढा यशस्वी करण्यासाठी, ''इथे पाहिजे जातीचे'' (पृ. ४२) तरच खऱ्या आदिवासींना न्याय मिळेल.

'आम्ही क्रांतिपुत्र–आदिमांचे' या कवितेत आदिवासींना क्रांतिपुत्र असल्याचा अभिमान वाढतो आहे. लाचारी, चोरीला नकार देऊन स्वाभिमानी जगण्याचा निर्धार प्रत्ययास येतो. आम्ही क्रांतिपुत्र वनवीर, मुक्तीचे गायक, संघर्षाचे प्रेरक, वनपुत्र, आदिसंतान या भूमातेला वंदन करत आहेत. क्रांतीच्या युद्धाच्या शपथा घेतलेले आदिवासी आणि त्यांचे जीवन महत्त्वाचेच आहे. त्यांच्या जिवाचं मोल अनन्यसाधारण आहे. 'मोल जिवाचं' या कवितेत आदिवासींची समर्पणशीलता प्रत्ययास येते. त्यांचे उद्ध्वस्त आयुष्य, भिकारीपण, उघड्या धरतीवर जीवन जगणे या सर्वातून मुक्तता होऊन मूळ निवासीपणासाठी जिवाचं मोल द्यावं वाटलं तरी हरकत नाही .

'जागवा मने पेटवा मशाली' ही या संग्रहातील शेवटची कविता व शीर्षक कविता आहे. वन आणि शहर या दोन्हीतल्या जाणिवा शब्दबद्ध करणारी रचना आहे. वनातला आदिमानव भुकेसाठी तडफडतो आहे, तर शहरात जात, पंथ, धर्माच्या नावावर स्वार्थी, ढोंगी, धर्मांध प्रवृत्तीकडून दंगली पेटवून माणुसकीला काळिमा फासला जात आहे. माणुसकीचा बिमोड करणारे हात् कलम करण्याचे कवीने ठरविले आहे.

निष्कर्ष :

१. आवाहनाची कविता.

२. क्रांतिप्रवण कविता.

३. नकार, विद्रोहाची कविता.

४. संघर्षशीलता हा तिचा स्थिरभाव आहे.

५. पारंपरिक मिथ्स् नाकारणारी कविता.

संदर्भग्रंथ

१. शेळमाके वामन, जागवा मने पेटवा मशाली, वंदन प्रकाशन, अमरावती, १९९१.

२. तुमराम विनायक, आदिवासी साहित्य : दिशा आणि दर्शन, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १७ नोव्हेंबर २०१२.

३. वाल्हेकर ज्ञानेश्वर, आदिवासी साहित्य : एक अभ्यास, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्र. आ. १५ ऑगस्ट २००९.